# ११ आर्थिक नियोजन (Economic Planning)

## भारतातील आर्थिक नियोजनाचा इतिहास

- भारतात नियोजनाची सुरुवात 1950 पासुन झाली आहे.
- जगात सर्वप्रथम रशिया या देशात नियोजनाचा वापर करण्यात आला.
- रशियाच्या नियोजनाला Gossplan हे नाव दिले होते.
- आर्थिक नियोजनामुळे रशियातील कृषीउत्पादनात चार पटीने वाढ झाली तर लोहउद्योगात 400 पट वाढ झाली.
- 15 मार्च, 1950 मध्ये भारतात नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली.
- 1 एप्रिल, 1951 पासून भारतात पंचवार्षिक योजनेला सुरुवात झाली.
- 1951-2017 या कालखंडात 12 पंचवार्षिक योजना राबविण्यात आल्या.
- या नियोजन कालखंडात 3 वेळा खंड पडला आहे.
- 1966-69 - योजना काळाला सुट्टी Plan Holidays (वार्षिक योजना)
- 1978-80 - सरकती योजना (Rolling Plan)
- 1990-92 - वार्षिक योजना (Yearly Plan)
- आतापर्यंत पाच वेळा वार्षिक योजना राबविण्यात आल्या आहेत.

## 1) विश्वेश्वरय्या योजना -




- म्हैसूर राज्याचे दिवाण व तेव्हाचे सर्वाधिक नावाजलेले **सिव्हिल इंजिनिअर श्री.एम. विश्वेश्वरय्या** यांनी सर्वप्रथम भारतीय नियोजनाची रुपरेषा मांडली. आपले विचार त्यांनी 'The Planned Economy of India' या पुस्तकात मांडले.
- 1934 मध्ये प्रकाशित झालेल्या या योजनेत विश्वेश्वरय्या यांनी औद्योगिकरणावर भर दिला. त्यामुळे कृषी व्यवस्थेवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या कमी होऊन त्यांचे उद्योग क्षेत्रात स्थानांतरण होईल, अशी संकल्पना होती. **'नियोजन करा किंवा नष्ट व्हा** या शब्दांमध्ये त्यांनी नियोजनाची आवश्यकता प्रतिपादित केली.

## 2) काँग्रेस योजना -

- 1938 चे काँग्रेसचे हरिपुरा येथील अधिवेशन **श्री. सुभाषचंद्र बोस** यांच्या अध्यक्षतेखाली झाले. गांधीजींच्या प्रेरणेने या अधिवेशनात एका राष्ट्रीय नियोजन समितीची (National Planning Committee) स्थापना करण्यात आली. पं. जवाहरलाल नेहरु या समितीचे अध्यक्ष होते. या समितीत 15 सदस्य व 29 उपसमित्या होत्या.
- दुसऱ्या महायुद्धाच्या काळात या समितीचे महत्त्व मागे पडले असले, तरी 1945 नंतर समितीला पुन्हा महत्त्व प्राप्त झाले. 1950 मध्ये स्थापन झालेला नियोजना आयोग याच समितीवर आधारलेला होता.

## 3) मुंबई योजना - 1944 -

### THE BOMBAY PLAN





The Signatories of the plan were:

1. Jehangir Ratanji Dadabhoy Tata,
2. Ghanshyam Das Birla
3. Ardeshir Dalal,
4. Sri Ram
5. Kasturbhai Lalbhai
6. Ardeshir Darabshaw Shroff,
7. Sir Purshottamdas Thakurdas and
8. John Mathai.

- मुंबईतील आठ प्रमुख उद्योगपतींनी (पुरुषोत्तमदास ठाकुरदास, जे.आर.डी. टाटा, जी.डी. बिर्ला, लाला श्री राम, कस्तूरभाई लालभाई, ए.डी. श्रॉफ, अवदेशिर दलाल आणि जॉन मथाई) भारताच्या आर्थिक विकासासाठी **'A Plan of Economic Development of India'** नावाने एक कृती आराखडा जाहीर केला. यास **मुंबई योजना**, **Bombay किंवा टाटा-बिर्ला** योजना असेही म्हणतात.
- तीव्र औद्योगिकीकरण, जमीन सुधारणा, लघुउद्योग, व्यापार व विकासाच्या घटकांबाबत मुंबई योजनेत सकारात्मक दृष्टिकोन होता.
- सर्वप्रथम भारतासाठी मिश्र अर्थव्यवस्थेची संकल्पना मांडली.

## 4) गांधी योजना -

- गांधीवादी विचारसरणीवरुन प्रभावित होऊन **श्री नारायण अग्रवाल** यांनी 1944 मध्ये गांधी योजना तयार केली.
- गांधी योजनेत ग्रामीण विकास, कुटीर व लघुउद्योग तसेच कृषी व्यवस्थेवर सर्वाधिक लक्ष केंद्रित करण्यात आले. '**आर्थिक विकेंद्रीकरण**' गांधी योजनेचे प्रमुख वैशिष्ट्य होते.

## 5) जनता योजना -

- 1945 मध्ये **मानवेंद्रनाथ रॉय** या कट्टर समाजवाद्याने जनता योजना मांडली. जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मुलभूत सुविधा देणारे नियोजन असावे, या विचारसरणीवर आधारित जनता योजनेत मार्क्सवादी समाजवाद डोकावत होता.
- कृषी व उद्योग दोन्ही क्षेत्रांवर भर देण्यात आला. ही योजना एकप्रकारे मुंबई योजनेला प्रत्युत्तरच होती.

## 6) सर्वोदय योजना -



- अहिंसक पद्धतीने शोषणविरहित समाज निर्माण करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून **जयप्रकाश नारायण** या समाजवादी नेत्याने जानेवारी 1950 मध्ये सर्वोदय योजना मांडली.
- कृषी क्षेत्र, लघु, कुटीर उद्योग, स्वयंपूर्णता, जमीनसुधारणा, आर्थिक विकेंद्रीकरण यावर भर देण्यात आला. सर्वोदय योजना महात्मा गांधी व आचार्य विनोबा भावे यांच्या विचारसरणीवर आधारलेली होती.


## नियोजन मंडळ (Planning Commission)

- **स्थापना** - 15 मार्च, 1950 या दिवशी तत्कालीन सरकारच्या अधिनियमाने नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली.

- **स्वरुप** -

1) असंवैधानिक किंवा घटनाबाह्य, कारण घटनेमध्ये नियोजन मंडळाचा उल्लेख नाही.
2) अवैधानिक किंवा कायदेबाह्य, कारण नियोजन मंडळाची स्थापना संसदेच्या कायद्याने करण्यात आलेली नाही.
3) सल्लागार मंडळ - नियोजन मंडळ केंद्र सरकारला नियोजनाच्या बाबतीत सल्लागार मंडळ म्हणून कार्य करते.

- **रचना** - नियोजन मंडळाची रचना, सदस्य संख्या तसेच सदस्य पात्रता इत्यादी बाबी निश्चित नाही. सरकार आपल्या मर्जीप्रमाणे वेळोवेळी त्यात बदल घडवून आणते. या दृष्टीने नियोजन मंडळ हे पंतप्रधान कार्यालयच्या (PMO) अधिनस्थ कार्य करते.



**नियोजन आयोगाचे पहिले अध्यक्ष**

i) **अध्यक्ष** - पंतप्रधान हे नियोजन मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. (नियोजन आयोगाचे पहिले अध्यक्ष पं. जवाहरलाल तर उपाध्यक्ष गुलझारीलाल नंदा होते. शेवटचे उपाध्यक्ष माँटेकसिंग अहलुवालिया हे होते.)
ii) **उपाध्यक्ष** - हे नियोजन मंडळाचे पुर्णवेळ काम करणारे सदस्य असतात.
iii) **काही कॅबिनेट मंत्री** - उदा. नियोजन मंत्री, अर्थमंत्री, संरक्षणमंत्री.
iv) काही अर्थतज्ज्ञ व विचारवंत.

- **कार्ये** -

i) देशातील नैसर्गिक, तांत्रिक व मानवी संसाधनांचा शोध घेणे. या संसाधनांचा संतुलित आणि परिणमकारक उपभोग करण्यासाठी पंचवार्षिक योजना तयार करते.
ii) नियोजनाची विविध टप्पे ठरविणे.
iii) देशाच्या आर्थिक प्रगतीच्या मार्गातील अडथळे सरकारला सूचित करणे.
iv) योजनेचे वेळोवेळी परिक्षण करुन त्यात योग्य ते बदल सुचविणे.

# ‘मित्र’ या संस्थेची स्थापना

**(Maharashtra Institution For Transformation)**

* निती आयोगाच्या धर्तीवर राज्याच्या विकासाला धोरणात्मक तांत्रिक तसेच कार्यात्मक दिशा देण्यासाठी ‘मित्र’ ची स्थापना करण्यात आली.

## घोषणा :

– {' ì (MITRA) स्थापण्याची घोषणा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी **१८ सप्टेंबर २०२२** रोजी केली.

## स्थापना :

– ०२ ऑक्टोंबर २०२२ रोजी मित्र स्थापण्याचा GR काढण्यात आला.

- MITRA राज्याची **‘थिंक टँक’** म्हणून कार्य करेल.

– ऑक्टोंबर २०२२ मध्ये ‘MITRA’ स्थापन करण्याची महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या वतीने घोषणा करण्यात आली.

– राज्याचे मुख्यमंत्री या 'MITRA' चे प्रमुख असतील तर 'MITRA' च्या उपाध्यक्षपदी २ डिसेंबर २०२२ रोजी **अजय आशर** यांची निवड करण्यात आली आहे.

## महत्वाचे –

* 'MITRA' ही संस्था निती आयोगाच्या धर्तीवर कार्य करेल.

* राज्याचा विकास करण्यासाठी निती आयोगाचे मित्र संस्थेस साह्य लाभेल.

* 'MITRA' च्या स्थापनेमुळे राज्यातील सर्व विभागाचा डेटा एकत्र करता येईल व योग्य धोरणात्मक निर्णय
घेता येईल.

* या परिवर्तनामुळे २०२७ पर्यंत राज्याची अर्थव्यवस्था २०२७ पर्यंत १ ट्रिलियन $ आणि २०४७ पर्यंत ३.५ ट्रिलियन $ ची अर्थव्यवस्था बनवण्याचे 'MITRA' चे लक्ष असेल.

'MITRA' राज्यातील माहिती पुरवण्यासाठी राज्यडेटा प्राधिकरण (SDA) स्थापन केले जाईल.

## 'MITRA' ची रचना

घोषणा : ऑक्टोंबर २०२२

स्थापना : २ डिसेंबर २०२२



अध्यक्ष : एकनाथ संभाजी शिंदे (मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य)



सहअध्यक्ष : देवेंद्र फडणवीस (उपमुख्यमंत्री)



उपाध्यक्ष : अजय आशर

सदस्य : तांत्रिक गट आणि वरिष्ठ अधिकारी असतील.

# NITI आयोग

National Institution for Transforming India

**भारतीय राष्ट्रीय परिवर्तन संस्था**

नीति आयोग

## विकास धोरण ठरवणारी शिखर संस्था


- **स्थापना** - 1 जानेवारी, 2015
- **मुख्यालय** - नवी दिल्ली

## निती आयोगाचे सदस्य



**- अध्यक्ष -**

पंतप्रधान



**- उपाध्यक्ष -**

डॉ.सुमन के.बेरी



**- मुख्यकार्यकारी अधिकारी -**

श्री.परमेश्वरन् अय्यर

## निती आयोगाचे पदसिद्ध सदस्य

i) अमित शहा
ii) निर्मला सीतारमन
iii) नरेंद्र तौमर
iv) राजनाथ सिंह

## विशेष आमंत्रित

i) नितीन गडकरी
ii) थावरचंद्र गेहलोत
iii) पियूष गोयल
iv) राव इंद्रजित सिंह

## पुर्णवेळ सदस्य




**विवेक देबेरॉय**
**(अर्थतज्ज्ञ)**



**व्ही.के. सारस्वत**
**(माजी अध्यक्ष, DRDO)**



**रमेश चंद**
**(शेतीतज्ज्ञ)**



**डॉ. विनोद पॉल**
**(आरोग्यतज्ज्ञ)**

- 15 ऑगस्ट, 2014 रोजी लाल किल्ल्यावरील भाषणा- दरम्यान श्री. नरेंद्र मोदी यांनी निती आयोगाची घोषणा केली.

### स्वरुप -

i) अवैधानिक
ii) घटनाबाह्य
iii) असंवैधानिक
iv) सल्लागारी

### उद्दिष्ट्ये (Objectives) -

- राज्यांची सक्रिय भागीदारी आणि राष्ट्रीय विकासाला प्राधान्य.
- पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांसाठी राष्ट्रीय अजेंडा तयार करणे.
- मजबूत राज्य आणि मजबूत राष्ट्र या धोरणानुसार राज्यांना मदत करणे.
- ग्रामपातळीवर योजना तयार करण्याची यंत्रणा विकसित करणे.
- सरकारच्या आर्थिक धोरणात राष्ट्रीय सुरक्षेच्या हिताला प्राधान्य देणे.
- आर्थिक प्रगतीची फळे शेवटच्या घटकापर्यंत पोचविणे.
- समान विचारसारणीच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय थिंकटँकसमवेत शैक्षणिक आणि धोरणात्मक संशोधनात भागीदारी करणे.
- आयोगावर पुढील नियुक्त्या केल्या आहेत.

## राष्ट्रीय विकास परिषद
(National Development Council)

■ **स्थापना -**

**6 ऑगस्ट,** 1952 या दिवशी तत्कालीन सरकारच्या अधिनियमाने

■ **स्थापनेची गरज -**

पंचवार्षिक योजना तयार करण्याच्या प्रक्रियेत घटक राज्यांना सहभागी करुन घेण्यासाठी.

■ **स्वरुप -**

1) असंवैधानिक
2) अवैधानिक
3) आर्थिक नियोजनाच्या बाबतीत धोरण तयार करणारी सर्वोच्च संस्था (Apex Policy Making Body)

■ **रचना -**

1967 आधी रा.वि. परिषदेमध्ये फक्त पंतप्रधान व राज्यांचे मुख्यमंत्री यांचा समावेश होता. 1967 पासून रा.वि. परिषदेमध्ये खालील सदस्य असतात.

i) पंतप्रधान - रा.वि. परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष
ii) सर्व केंद्रीय कॅबिनेट मंत्री
iii) घटकराज्याचे मुख्यमंत्री
iv) केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासक
v) नियोजन मंडळाचे सर्व सदस्य.

रा.वि. परिषद ही वर्षभर काम करणारी संस्था नाही. वर्षातून तिच्या कमीत कमी दोन सभा व्हाव्या अशी अपेक्षा असते.

■ **कार्ये -**

i) नियोजन मंडळाने तयार केलेल्या पंचवार्षिक योजनेच्या अंतिम आराखड्याला मान्यता देणे. रा.वि. परिषदेच्या मान्यतेशिवाय योजनेची प्रत्यक्ष कार्यवाही सुरु होऊ शकत नाही (मात्र योजनेला अंतिम मान्यता संसद देते.)
ii) योजनेच वेळोवेळी परीक्षण व मूल्यमापन करणे.
iii) आर्थिक विकासावर परिणाम करणाऱ्या सामाजिक-आर्थिक धोरणांचे परीक्षण करणे.

## नियोजनाचे प्रकार
(Types of Planning)

वेगवेगळ्या आधारांवर नियोजनाचे विविध प्रकार केले जातात.

**अ) आदेशाद्वारे नियोजन, प्रलोभनाद्वारे नियोजन व सूचक नियोजन -**

**1) आदेशाद्वारे नियोजन** (Planning by Direction) -

■ असे नियोजन **समाजवादी अर्थव्यवस्था** अविभाज्य घटक असते, त्याद्वारे सरकार आदेशाद्वारे वस्तू व सेवांचे उत्पादन किती व कसे करावे, त्यांच्या किंमती इत्यादी बाबी निश्चित करते. ही उद्दिष्ट्ये पूर्ण करण्याचे काम शासकीय आदेशानुसार कृषि, उद्योग व सेवा क्षेत्रांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत पूर्ण केले जाते. हे नियोजन सर्वसमावेशक असून संपूर्ण अर्थव्यवस्थेला व्यापून टाकणारे असते.

**2) प्रलोभनाद्वारे नियोजन** (Planning by Indecement) -

■ असे नियोजन भारतासारख्या **लोकशाही राज्यपद्धतीमध्ये** आढळते. यामध्ये बाजारव्यवस्थेत सरकार हस्तक्षेप करते, मात्र त्यात सक्ती नसते. उद्योजकता, उत्पादन व उपभोगाचे स्वातंत्र्य असते, मात्र सरकार विविध वित्तीय व राजकोषीय प्रलोभनांद्वारे आपली उद्दिष्ट्ये साध्य करुन घेण्याचा प्रयत्न करते. उदा. अनुदाने, कर सवलती इत्यादी.

**3) सुचक नियोजन** (Indicative Planning) -

■ **फ्रान्ससारख्या काही मिश्र अर्थव्यवस्थांमध्ये** असे नियोजन आढळून येते. यामध्ये सरकारमार्फत असे नियोजन आढळून येते. यामध्ये सरकारमार्फत खाजगी क्षेत्र कडकपणे नियंत्रित न करता त्यांना विविध सोयी-सवलती देऊन त्यांच्याकडून देशाच्या विकासाची सामाजिक-आर्थिक उद्दिष्ट्ये साध्य करुन घेण्याचा प्रयत्न केला जातो. **भारतानेही आठव्या योजनेपासून सूचक नियोजनाचा अवलंब केला.**